अर्ज डब्ल्यु.सी. (सी) कं ६/२०२५ निशाणी कं.यु-९



<u>शपथेवर जादा सरतपास</u> :-

<u>अर्जदाराचे विधीज्ञ श्री. आर.के. पातेकर यांचेमार्फत</u> :-

१६. माझे नाव रूख्मीन पांडुरंग चोथे असुन माझे वय ४० वर्षे आहे. मी मांदळा, ता. घनसावंगी, जि. जालना येथे राहते. सदर शपथपत्रावर मी माझे डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा उमटविला असून त्यातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आलेला आहे.

१७. मी या प्रकरणी नि. यु-३ च्या यादीसोबत कागद दाखल केलेले आहेत, त्यामध्ये अ.क्र. १ ला माझे पती नामे पांडुरंग धोंडीबा चोथे यांच्या दि. ३०/०५/२०२४ च्या नगर पंचायत, घनसावंगी यांनी दिलेल्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत आहे, त्यावर पोलिस निरीक्षक, पोलिस ठाणे, घनसावंगी यांची सही आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीला निशाणी क्र. यु-१० देण्यात आला. याच यादीच्या अ.क्र. २ ला दि. २६/०५/२०२४ च्या प्रथम खबरी अहवाल क्र. ०२१०/२०२४ पोलिस ठाणे घनसावंगी ची सत्यप्रत दाखल केली आहे, त्यावर पोलिस ठाणे अंमलदार, पोलिस ठाणे घनसावंगी यांची सही व पोलिस ठाण्याचा शिक्का आहे. सदरचा प्रथम खबरी अहवाल हा माझे पतीला झालेला अपघात आणि त्यातुन त्यांचा झालेला मृत्यू या अनुषंगाने आहे. या प्रथम खबरी अहवालाच्या प्रतीला निशाणी क्र. यु-११ देण्यात आला. अ.क्र. ३ ला वर नमूद एफ.आय. आर. च्या अनुषंगाने दि. २६/०५/२०२४ च्या झालेल्या घटनास्थळ पंचनाम्याची प्रत दाखल आहे, त्यावर पोलिस निरीक्षक, पोलिस ठाणे घनसावंगी यांची सही आहे. या घटनास्थळ पंचनाम्याच्या प्रतीला निशाणी क्र. यु-१२ देण्यात आला. अ.क्र. ४ ला दि. २२/०५/२०२४ च्या मरणोत्तर पंचनाम्याची प्रत दाखल आहे. सदरचा मरणोत्तर पंचनामा माझे पतीच्या प्रेताच्या अनुषंगाने आहे. त्यावर सत्यप्रत म्हणून पोलिस निरीक्षक, घनसावंगी यांची सही आहे.

या पंचनाम्याच्या प्रतीला निशाणी क्र. यु-१३ देण्यात आला. अ.क्र. ५ ला विद्युत निरीक्षक, जालना यांचा दि. २६/०६/२०२४ रोजीच्या अभिप्राय पत्राची छायांकित प्रत दाखल आहे. मुळ अभिप्राय माझे ताब्यात असून उलटतपासावेळी हजर करण्यास तयार आहे. सबब या अभिप्राय पत्राच्या प्रतीला निशाणी क्र. यु-१४ देण्यात आला.

जादा सरतपास पूर्ण.

वि.प. तर्फे विधीज्ञ श्री. जी.आर. कड हजर. त्यांनी सरतपासाच्या प्रतिज्ञापत्राची प्रत स्विकारली. उलटतपासाकामी मुदत मागितली. सबब उलटतपासाला तहकूब.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

*सही/-*
(श.ज्ञा.बाऊचकर)
कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त
तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, जालना.

जालना
दिनांक ०९/१०/२०२५

<u>शपथेवर उलटतपास.</u>

<u>वि.प. तर्फे विधीज्ञ श्री. जी. आर. कड यांचेमार्फत :-</u>

१८. हे म्हणणे खरे आहे की, महा. राज्य विद्युत वितरण कंपनी ही जवळपास संपुर्ण महाराष्ट्रात कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वि.प. कंपनीमध्ये स्वतःचे प्रशिक्षित अधिकारी आणि कर्मचारी आहेत. वि.प. कंपनीमध्ये विद्युत पुरवठयाच्या अनुषंगाने तज्ञ कर्मचारी असतात, या तुमच्या म्हणण्याबाबत मला माहिती नाही. वि.प. कंपनीमध्ये असलेले कर्मचारी यांनी वेगवेगळे कोर्स केलेले असतात याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वि.प. कंपनीमध्ये उमेदवाराची शैक्षणिक पात्रता आणि परीक्षा घेवून त्यानंतरच नेमणूक केली जाते. वि.प. विद्युत कंपनी ही सरकारी कंपनी असून ते त्यांचे स्वतःचे अधिकारी, कर्मचारी यांचेमार्फतच लाईनसंबंधी, मेंटेनन्ससंबंधी व इतर कार्यालयीन कामकाजासंबंधी स्वतःचे काम करीत असतात. वि.प. कंपनीमध्ये खाजगी व्यक्तीकडून काम करून घेतले जात नाही आणि वि.प. च्या अधिकारी आणि कर्मचा-यांना तसा अधिकार नाही, या तुमच्या म्हणण्याबाबत मला माहिती नाही.

१९. पांडुरंग चोथे हे माझे पती होते. ते आज हयात नाहीत. त्यांना कोणताही आजार नव्हता. त्यांचे शिक्षण इयत्ता दहावी पास होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीचे शिक्षण केवळ दहावी पास असल्याने त्यांना इलेक्ट्रीकलचे ज्ञान नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती इलेक्ट्रीकलचे कोणतेही काम करीत नव्हते. दि. २२/०५/२०२४ रोजी माझे पती कामाला गेले होते, कोणत्याही गावाला गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सुशांत गुंडरे हे माझे पतीला ओळखत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती गैरअर्जदार महावितरण कंपनीच्या अधिका-यांच्या निर्देशा-

नुसार त्यांच्या हाताखाली कधीही काम करीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सुशांत गुंडरे हे महावितरणचे कर्मचारी असल्याने ते स्वत:चे काम स्वत:च करीत होते व ते त्यात तज्ञ होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीला दि. २२/०५/२०२४ रोजी वा अन्य दिवशी सुशांत गुंडरे यांनी अथवा महावितरणच्या कोणत्याही अधिका-यानी कधीही फोनद्वारे अथवा प्रत्यक्ष काम करण्याकरिता बोलाविले नाही व पांडुरंग चोथे स्वत: सुशांत गुंडरे अथवा इतर गैरअर्जदारांच्या सांगण्यावरून कधीही महावितरणचे काम करण्यास गेले नाही व त्यांना ट्रान्सफॉर्मरवर लाईटचे काम करीत असतांना त्यांना विद्युत शॉक लागला नाही व ते इलेक्ट्रीक शॉकने मयत ही झाले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पांडुरंग चोथे चा विद्युत शॉकने मृत्यू झाला नाही आणि त्यामुळे मयताचे भावाने फोन करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे आणि माझे नातेवाईकांच्या चुकीच्या सांगण्यावरून खोटा गुन्हा दाखल केला व खोटा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, विद्युत निरीक्षकांनी चुकीचा तपास करून चुकीचा अहवाल दिला. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीचे मृत्यूसमयी वय ६० ते ६५ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती कोणताही कामधंदा करीत नव्हते आणि ते सतत आजारी असायचे. हे म्हणणे खरे नाही की, माझे उत्पन्नावरच पांडुरंग चोथे जीवन जगायचे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीला शेती नव्हती आणि त्यातून त्यांना खर्च वजा जाता सुमारे दोन ते तीन लाख उत्पन्न मिळत होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला शेती नसल्यानेच आम्ही दावा दाखल करतेवेळी सात-बारा उतारा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती गैरअर्जदारांकडे कधीही काम करीत नव्हते आणि त्यामुळे गैरअर्जदारांकडून त्यांना कधीही ६०० रूपये मजुरी मिळत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीच्या

मृत्युशी महावितरण कंपनीचा कोणताही संबंध अगर निष्काळजीपणा नाही त्याचबरोबर ते नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात रू. ३५,००,०००/- मिळण्याची केलेली मागणी चुकीची असून त्याप्रमाणे रक्कम मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराविरूध्द दावा दाखल करण्याला आम्हाला कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यास कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, विद्युत निरीक्षक श्री भालेराव आणि श्री दत्ता चौधरी हे प्रत्यक्ष घटनेस साक्षीदार आहेत, हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात नमुद कोणतीही घटना घडलेली नाही त्यामुळे साक्षीदार असण्याचा प्रश्नच नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीला काम करण्यासाठी सुशांत गुंडरे यांनी कधीही बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सुशांत गुंडरे यांनी खाली थांबुन माझे पतीला वर चढविले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीला दि. २२/०५/२०२४ रोजी ६.४५ वाजता विद्युत शॉक लागुन मृत्यु झाला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, विद्युत कंपनी मोठी असल्याने त्यांचेकडून काही रक्कम मिळावी या उद्देशाने खोटया आशयाचा दावा दाखल करून खोटे शपथपत्र दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास निरंक.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

*सही/-*
(श.ज्ञा.बाऊचकर)
कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त
तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, जालना.

जालना
दिनांक ०८/०१/२०२६